# पंतप्रधान नरेंद्र मोदींचे वक्तव्य गावच्या सरपंचासारखे : ॲड.प्रकाश आंबेडकर

**कोल्हापूर (प्रतिनिधी)** : कर्नाटक निवडणुकीच्या प्रचारात देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी ज्या पद्धतीने वक्तव्य करीत आहेत ते गावच्या सरपंचासारखे आहे. अशी खोचक टीका भारिप बहुजन महासंघाचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केली. तसेच माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांनी मराठा आरक्षणाचा बट्ट्याबोळ केला. त्याच पध्दतीने धनगर समाजाचा खेळखंडोबा सुरू असल्याचीही टीका त्यांनी केली आहे. कोल्हापुरात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.



कर्नाटक निवडणुकीत जातीय द्वेष पसरविण्याचे काम सुरू असून नव्या लुटारूंचे सरकार कसे येईल यासाठीच पंतप्रधान मोदी यांचा प्रयत्न सुरू असल्याची घणाघाती टिका देखील प्रकाश आंबेडकर यांनी यावेळी केली. देशात ज्या पद्धतीने कारभार सुरू आहे, त्या विरोधात एकत्र येण्याची गरज आहे. यासाठीच समाजातील अलुतेदार आणि बलुतेदार यांना एकत्र घेत आम्ही सरकारविरोधात उभे राहत असल्याचे आंबेडकर म्हणाले.

## २० मे रोजी पंढरपूर येथे सत्ता संपादन निर्धार परिषद...

*२० मे रोजी पंढरपूर येथे धनगर समाजाच्या वतीने आयोजित सत्ता संपादन निर्धार परिषद होत असल्याची माहिती देखील ॲड.प्रकाश आंबेडकर यांनी यावेळी दिली. धनगर समाजाचा अनुसूचित जमातीमध्ये समावेश व्हावा, अशी मागणी गेली अनेक वर्षापासून करण्यात येत आहे. मात्र यापूर्वीच्या आघाडी सरकारप्रमाणे आताचे भाजप सरकार देखील धनगर समाजाची फसवणूक करीत असल्याचा आरोप आंबेडकरांनी केला. धनगर समाजाच्या न्याय मागण्यासाठी पंढरपूर येथे सत्ता संपादन निर्धार परिषद होत असून यामध्ये आपण देखील प्रमुख मार्गदर्शक म्हणून उपस्थित राहणार असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.*

कर्नाटक निवडणूकीत सुरू असलेल्या भाजप सरकारच्या प्रचार यंत्रणेवरही त्यांनी यावेळी जोरदार टिका केली. देशाच्या पंतप्रधानांनी राष्ट्रीय पातळीवरील प्रश्नावर लक्ष दिले पाहिजे. मात्र नरेंद्र मोदी ज्या पद्धतीने प्रचार यंत्रणेत भाष्य करीत आहेत ते एखाद्या गावच्या सरपंचासारखे असल्याचे ते म्हणाले.

## शिक्षण मंत्र्याच्या वक्तव्यामुळे धनगर आणि लिंगायतांमध्ये वाद

सोलापूर येथील विद्यापीठाला अहिल्याबाई होळकर यांचे नाव देण्यात यावे अशी धनगर समाजाची गेल्या अनेक वर्षांपासूनची मागणी आहे. ही मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मान्य देखील केली होती. मात्र, या विद्यापीठाला अहिल्याबाई होळकर याचे नाव दिल्यास जातीय दंगल होईल, असे वक्तव्य शिक्षणमंत्री विनोद तावडे यांनी केले आहे. त्यामुळे सोलापूर विद्यापीठ नामातंराचा वाद नसताना वाद निर्माण झालेला दिसत असल्याचे आंबेडकर यांनी सांगितले.

शिक्षण मंत्री विनोद तावडे यांच्या वक्तव्यामुळे धनगर आणि लिंगायतांमध्ये कधीही वाद नव्हता तो आता सुरू झाला आहे. अहिल्याबाईचे कार्य सर्वांना माहिती आहे. महाराष्ट्रात त्यांच्या नावाने कुठेही वादंग उठलेले नाही. मंत्री तावडे अहिल्याबाईंची बदनामी करत आहेत. मुख्यमंत्री फडणवीस जाणकार आणि हुशार आहेत. शिक्षण मंत्री विनोद तावडे यांनी इतिहासातील व्यक्तीचा अपमान केला आहे. त्यांनी याबद्दल माफी मागितली पाहिजे, असे आवाहन ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी केले.

## 'राणें'मुळे आरक्षणाचा बट्याबोळ

*माजी मुख्यमंत्री नारायण राणे यांनी मराठा आरक्षणाचा बट्टयाबोळ केला. तशाच पध्दतीने धनगर समाजाच्या आरक्षणाचा देखील खेळखंडोबा सुरु आहे. काँग्रेस सरकारच्या काळात धनगर समाजाला आरक्षण देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. भाजपने देखील सत्तेवर आल्यानंतर धनगर समाजाला आरक्षण देण्याचे जाहीर केले होते. मात्र आरक्षण भिजत ठेवले आहे. त्यामुळे हे सरकार गेले तरीही धनगर समाजाला आरक्षण मिळेल का? अशी शंका भारिप बहुजन महासंघाचे अध्यक्ष ॲड. प्रकाश आंबेडकर यांनी व्यक्त केली.*

# आरुष फायर सिस्टिम्स् प्रा.लि. कंपनीला आंतरराष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित

**पुणे (प्रतिनिधी)** : पुणे स्थित आणि राष्ट्रीय स्थरावर सुरक्षा उपकरणांच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या तसेच सुरक्षिततेबद्दल राष्ट्रीय स्थरावर जनजागृती करणाऱ्या आरुष फायर सिस्टिम्स् प्रा.लि. कंपनीला इंटरनॅशनल आचिव्हर्स फाऊंडेशनतर्फे देण्यात येणाऱ्या 'आऊटस्टँडींग अचिव्हमेंट ॲवार्ड फॉर कॉलिटी फायर प्रोटेक्शन इंक्विपमेंट ॲड सर्व्हिसेस' या अंतरराष्ट्रीय पुरस्काराने थायलंडचे माजी उपपंतप्रधान एच. ई. खाऊन कॉर्न उब्बारन्सी व फ्रान्सच्या प्रिन्सेस इसाबेल लाफॉरय्यु यांच्या हस्ते बँकॉक येथे गौरविण्यात आले. कंपनीच्या वतीने संस्थापक श्री. राहुल जाधव यांनी पुरस्कार स्वीकारला.




बँकॉक येथे झालेल्या या पुरस्कार सोहळ्यात भारतामधील विविध राज्यांमधुन तसेच आशिया खंडातील काही देशांमधुन आलेले विविध क्षेत्रांमधील उद्योजक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या प्रसंगी 'ग्लोबल कॉर्पोरेट अचिव्हमेंटस् ॲड सोशल रिस्पॉसिबिलीटीजफ या परिसंवादाचे आयोजन केले. या परिसंवादात बोलताना थायलंडचे माजी उपपंतप्रधान एच.ई. खाऊन कॉर्न डब्बारन्सी यांनी उपस्थित उद्योजकांना आवाहन केले की, त्यांनी त्यांचे उद्योग आशिया खंडातील थायलंड, चायना, मलेशिया, भारत इ. देशांमध्ये वाढवावे जेणेकरून या देशातील उद्योगाला प्रोस्थाहन मिळेल व मैत्रिचे संबंध कायम राहण्यास मदत होईल.

हा पुरस्कार मिळाल्यानंतर आरुष फायर सिस्टिम्स्चे संचालक श्री. राहुल जाधव यांनी सुरक्षा क्षेत्रात कामगिरी आणि जनजागृतीची जी मोहिम हाती घेतलेली आहे त्याची पोचपावती मिळाली असे सांगून यापुढे अंतरराष्ट्रीय स्थरावर मोहिम नेण्याचा विश्वास व्यक्त केला.

# राज्यात १८ जूनपासून सुरु होणार उर्दू माध्यमांच्या शाळा

**मुंबई (प्रतिनिधी)** : येत्या शैक्षणिक वर्षाची सुरुवात १५ जूनपासून होणार आहे. मात्र, १६ जूनला रमजान ईद असल्याने राज्यातील सर्व उर्दू माध्यमांच्या शाळांना २ दिवसांची सूट देण्याचा निर्णय शालेय शिक्षण विभागाने घेतला आहे. त्यामुळे उर्दू शाळांच्या शैक्षणिक वर्षाची सुरूवात १८ जूनला होणार असल्याचे शिक्षण विभागाने स्पष्ट केले आहे.

राज्यात विदर्भ वगळता नवीन शैक्षणिक वर्षाची सुरूवात ही १५ जूनपासून होते. यंदा अपवादानेच या उर्दू शाळांना ईदची सुट्टी येत असल्याने त्यांना २ दिवसांची मुभा देण्यात आली आहे. या निर्णयामुळे राज्यातील सर्व उर्दू



माध्यमांच्या शाळा या १५ जूनऐवजी आता १८ जूनला सुरू होणार आहेत. मात्र, इतर शाळा या १५ जूनपासूनच सुरू होतील. त्यात कोणताही बदल करण्यात आला नसल्याची माहिती राज्य शिक्षण मंडळाने आज काढलेल्या एका परिपत्रकात दिली आहे.

१५ जून रोजी शाळांची सुरूवात होणार असली, तरी दुसऱ्याच दिवशी ईद आणि पुढील दिवशी रविवार येत आहे. त्यामुळे खऱ्या अर्थाने राज्यातील शाळा या सोमवारी, १८ जूनपासून गजबणार आहेत.

# 'त्या' १०० कोटी रुपयांच्या फाईलीवरुन मुस्लीम समाजात संभ्रमावस्था

ALL INDIA MUSLIM O.B.C. ORGANISATION

**मुंबई (प्रतिनिधी)** : राज्यातील मुस्लीम समाजाच्या विकासासाठी वफ्क बोर्डाचे कार्य लक्षात घेऊन राज्य सरकारने मागील वर्षाच्या नागपूर येथील हिवाळी अधिवेशनात १०० कोटी रुपयांचा निधी देण्याची घोषणा केली होती. त्यानंतर अर्थसंकल्पीय अधिवेशनात त्यासाठी तरतूद करून त्याचा बराच मोठा गाजावाजाही करण्यात आला. मात्र, त्यासाठीची फाईल अद्याप अर्थखात्यात मंजुरीसाठी पडून असल्याने मुस्लीम समाजात याविषयी संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले आहे.

याच पार्श्वभूमीवर आज मुंबईत इस्लाम जिमखाना येथे सायंकाळी ७ वा. ऑल इंडिया मुस्लीम ओबीसी संघटनेने एक कार्यक्रम ठेवला असून, त्यात यावर चर्चा होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

## मुस्लिम मतांचे ध्रुविकरण करणाऱ्या ओवैसींच्या डोक्यावर 'भगवा' फेटा

भाजपाचे नेते आशिष शेलार यांनी ऑल इंडिया मुस्लीम ओबीसी संघटनेने सुरू केलेल्या वफ्क बोर्डाच्या कामाची दखल घेत त्यासाठी विधानमंडळात पाठपुरावा केला होता. त्याच पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मागील वर्षी २०० कोटी रुपयांचा निधी वफ्क बोर्डाला देण्याची घोषणा केली होती. त्यातील पहिला टप्पा हा १०० कोटी रुपयांचा आत्तापर्यंत मिळणे अपेक्षित होते.

**'मुस्लिम पर्सनल लॉ बोर्ड' दहशतवादी संघटनांची शाखा – शिया सेंट्रल वक्फ बोर्ड**

ऑल इंडिया मुस्लीम ओबीसी संघटनेनेचे राष्ट्रीय अध्यक्ष शब्बीर अंसारी यांच्या अध्यक्षतेखाली राज्यात वफ्क बोर्डाच्या जमिनी आणि मालमत्तेविषयी माहिती गोळा करण्याचे मोठे काम सुरू आहे. आज या संघटनेचे विविध पदे ही मंत्री महादेव जानकर आणि अर्थशास्त्रज्ञ डॉ. भालचंद्र मुगणेकर यांच्या प्रमुख उपस्थिती बहाल करण्यात येणार आहेत. या कार्यक्रमात मुस्लीम समाजाच्या विकासावर चर्चा केली जाणार असून, वफ्क बोर्डाच्या जमिनीचा मुद्दाही प्रमुख असेल अशी माहिती ऑल इंडिया मुस्लीम ओबीसी संघटनेचे सचिव शाहरुख मुलाणी यांनी बोलताना दिली.

## भारतीय नागरिक २०१९ला मोदींना मत देणार नाहीत : अय्यर

**लाहोर** : गेल्या निवडणुकीत



७० टक्के भारतीयांनी पंतप्रधान नरेंद्र मोदींना मतदान केले नव्हते, परंतू आपापसातील मतभेदांमुळे काँग्रेसचा पराभव झाला, असे वक्तव्य काँग्रेसचे निलंबित नेते मणिशंकर अय्यर यांनी सोमवारी केले. मला आशा आहे ते ७० टक्के लोक एकत्र येऊन देश सध्या ज्या परिस्थितीतून जात आहे ती परिस्थिती संपवतील असे ते पुढे बोलतांना म्हणाले.

# पत्नी, मुलीवर पेट्रोल ओतून पतीची रेल्वेखाली आत्महत्या

**जळगाव** : पत्नी आणि मुलीला पेट्रोल ओतून जिवंत पेटवून देत पतीने स्वतः रेल्वेखाली आत्महत्या केली. हा धक्कादायक प्रकार जिल्ह्यातील अमळनेरमध्ये प्रताप मिल कम्पाऊंड परिसरात घडल्याने खळबळ उडाली आहे.

सरिता अनिल खैरनार (वय ३३) या महिलेला तिचा पती अनिल खैरनारने पेट्रोल ओतून पेटवले. या घटनेत सरिता तसेच त्यांची ५ वर्षांची चिमुकली तनुजा गंभीररित्या भाजली गेली. यानंतर स्वतः अनिल खैरनारने मालगाडी खाली उडी घेऊन आत्महत्या केली. दरम्यान, जखमी मायलेकींना धुळ्यातील हॉस्पिटलमध्ये दाखल करण्यात आले होते. मात्र उपचारादरम्यान चिमुकल्या तनुजाचा मृत्यू झाला. अनिल खैरनार निवृत्त सैनिक होते. ते मूळचे धुळे जिल्ह्यातील साक्री तालुक्यातील दुसाने येथील रहिवासी होते.

पहाटेच्या सुमारास त्याने पत्नी सरिता झोपेत असताना तिच्या गळ्यावर चाकूने वार केला. वेळीच जाग आल्याने सरिताने त्यास प्रतिकार केला. मात्र हातात असलेल्या बाटलीतील पेट्रोल अनिलने सरिताच्या अंगावर टाकून तिला



पेटवले. हा प्रकार पाहून ५ वर्षांच्या तनुजाने आईकडे धाव घेतली. तीदेखील यात गंभीर जखमी झाली. या घटनेनंतर दोघींना अमळनेरमधील ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. सरिता ४२ टक्के तर तनुजा ९० टक्के भाजल्याने प्रथमोपचार करून त्यांना धुळे जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले. येथे सरितावर उपचार करण्यात आले. तिच्या गळ्याला २० टाके पडले असून तिथे धुळे पोलिसांनी तिचा जबाब नोंदवला.

यानंतर दोघांनी खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, पत्नीच्या हत्येचा प्रयत्न करणाऱ्या अनिल खैरनार लगेचच घरातून पसार झाला आणि त्याने रेल्वे मालगाडीखाली उडी घेऊन आत्महत्या केली. दरम्यान, अनिल खैरनारने केलेल्या कृत्याचा पोलीस अधिक तपास करत आहेत.

## झेंडेवाडीत बिबट्याचा धुमाकूळ, हल्ल्यात १५ मेंढ्या ठार

**पुणे** : जिल्ह्यातील सासवडजवळील झेंडेवाडी गावात बिबट्याने धुमाकूळ घातल्याची घटना समोर आली आहे. गावाच्या वळणावर असलेल्या मेंढपाळ वस्तीत मंगळवारी बिबट्याने हल्ला करत धुमाकूळ घातला. या हल्ल्यात १५ मेंढ्या ठार झाल्या. या परिसरात यापूर्वीही शेतकऱ्यांना ३ बिबटे आढळले होते. वनविभागाने या ठिकाणी पिंजराही लावला होता. तो वनविभागाच्या अधिकाऱ्यांनी न सांगताच काढून नेला, असा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

# संभाजी महाराजांच्या जयंतीदिनी शेतकरी करणार जेलभरो आंदोलन



**मुंबई (प्रतिनिधी)** : शेतकऱ्याच्या कर्जमाफीसाठी सरकारने आणलेली छत्रपती शिवाजी महाराज कृषी सन्मान योजना ही फसवणूक करणारी ठरली. या फसवणूक करणाऱ्या सरकारला ताळ्यावर आणण्यासाठी राज्य शेतकरी सुकाणू समितीने छत्रपती संभाजी महाराजांच्या जयंतीचे औचित्य साधून १४ मे रोजी राज्यात जेलभरो आंदोलनाची हाक दिली आहे.

या जेलभरोत सहभागी होण्यासाठी मागील काही महिन्यांपासून तब्बल २ लाखांहून अधिक शेतकरी आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांनी आपले अर्ज भरून नोंदणी केली आहे. त्यामुळे राज्यभरातील तहसीलदार, जिल्हाधिकारी कार्यालयासोबत स्थानिक पोलीस ठाण्यात जेलभरो आंदोलन करण्यात येणार आहे. यात राज्यातील बँक आणि इतर कामगार संघटनाही सहभागी होणार असल्याची माहिती सुकाणू समितीचे अध्यक्ष रघुनाथदादा पाटील यांनी आज पत्रकार परिषदेत दिली.

समितीने बेळगावसह राज्यातील ३६ जिल्ह्यांतील शेतकरी जागर यात्रा यशस्वी केल्यानंतर हे जेलभरो आंदोलन केले जाणार आहे. यात शेतकरीविरोधी धोरणाचा निषेध केला जाणार आहे. तसेच, यात सरसकट कर्जमुक्ती, वीजबिल मुक्ती, शेतीमालाला उत्पादन खर्च अधिक ५० टक्के नफा इतका हमीभाव, पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील विमानतळ, समृद्धी महामाया, रत्नागिरी जिल्ह्यातील रिफायनरी नाणार प्रकल्प रद्द करणे, आदी मागण्या यात केल्या जाणार आहेत.

# अभिनेत्री मिनाक्षी थापा हत्याकांड; आरोपींना न्यायालयाने ठरविले दोषी

**मुंबई (प्रतिनिधी)** : नेपाळी चित्रपट अभिनेत्री मिनाक्षी थापा हत्याकांडातील आरोपींना आज सत्र न्यायालयाने दोषी ठरविले आहे. बॉलीवूड क्षेत्रात जूनियर आर्टिस्ट म्हणून काम करणारी नेपाळी अभिनेत्री मिनाक्षी थापा हिची हत्या सन २०१२ मध्ये प्रिती सुरिन आणि अमित जयस्वाल या



दोघांनी घडवून आणली होती.

मिनाक्षी थापाचे शीर धडापासून वेगळे करत तिचा खून करण्यात आला होता. बॉलिवूडमधील दिग्दर्शक मधुर भांडारकर यांच्या 'हिरोईन' चित्रपटाच्या चित्रीकरणादरम्यान मृत मिनाक्षीची आरोपी प्रीती सुरीम आणि अमित जयस्वाल यांच्याशी मैत्री झाली होती.

भोजपुरी चित्रपटात काम देण्याच्या बहाण्याने मिनाक्षीला आरोपींनी गोरखपूर येथे नेले. नंतर आरोपींनी मिनाक्षीच्या आईला फोन करून १५ लाख रुपयांची खंडणी मागितली होती. मिनाक्षीच्या आईने केवळ ६० हजार रुपये दिले होते. आरोपींनी खंडणी न मिळाल्याने मिनाक्षीची हत्या केली. मिनाक्षीचे धड शरीरापासून वेगळे करून पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्नही आरोपींनी केला होता.

## मणिपूरमध्ये बीएसएफच्या मुख्यालयाजवळ आयईडी स्फोट, २ जवान शहीद

**इंफाळ** : सीमा सुरक्षा दलाच्या (बीएसएफ) मुख्यालयाजवळ आयईडी स्फोट झाल्याची घटना आज दुपारी घडली आहे. मणिपूरच्या इंफाळमधील कोईंगी परिसरात झालेल्या या स्फोटात बीएसफचे २ जवान शहीद झाले आहेत.



या हल्ल्याने सुरक्षा दल सतर्क झाले आहेत.

## 'ग्रे वॉटर'मुळे तळजाई टेकडी होणार हिरवीगार

**पुणे** : देशातील पहिल्या 'ग्रे वॉटर' प्रकल्पाचे पाणी मंगळवारपासून पुण्यातील 'तळजाई' टेकडीवरील झाडांना दिले जात आहे. या प्रकल्पातून दर दिवशी मिळणाऱ्या ५ लाख लिटर पाण्यामुळे तळजाई टेकडी परिसरातील लाखो झाडे वर्षभर हिरवीगार राहण्यास मदत होणार आहे.

स्थानिक नगरसेवक आबा बागुल यांच्या संकल्पनेतून साकारलेल्या देशातील पहिल्या ग्रे वॉटर प्रकल्पाचे मंगळवारी जलपूजन करण्यात आले. या प्रकल्पामुळे ओढ्यातील ग्रे वॉटर शुद्ध करून झाडांना वर्षभर दिले जाणार आहे.

# ज्ञानेश्वरचे ग्रंथपाल पोपट उगले यांना सेवक ग्रंथमित्र पुरस्काराने सन्मानित

**नेवासे** : तालुक्यातील भेंडे येथील ज्ञानेश्वर साखर कारखान्याचे श्री.ज्ञानेश्वर ग्रंथालयाचे ग्रंथपाल पोपट रभाजी उगले यांना सन २०१५-१६ चा डॉ. एस. आर. रंगनाथन उत्कृष्ट ग्रंथालय सेवक ग्रंथमित्र पुरस्कार मिळाला. उच्च व तंत्र शिक्षण मंत्री विनोद तावडे यांच्या हस्ते उगले यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आला आहे. महाराष्ट्र शासनाच्या ग्रंथालय विभागाच्या वतीने हा पुरस्कार देण्यात येतो.

उगले हे भेंडे येथील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या श्री ज्ञानेश्वर ग्रंथालयात १९९४ पासून ग्रंथपाल म्हणून कार्यरत आहेत. शासन मान्यता ब वर्गातील या वाचनालयात सुमारे १५००० ग्रंथ



संपदा आहे. यापूर्वी या ग्रंथलयास डॉ. बाबासाहेब आंबेडकर उत्कृष्ट ग्रंथालय पुरस्कारही प्राप्त झालेला आहे .

मुंबई विद्यापीठाचे दिक्षांत सभागृहात झालेल्या विशेष कार्यक्रमात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री विनोद तावडे यांचे हस्ते व राज्य मंत्री रवींद्र वायकर यांच्या प्रमुख उपस्थितीत हा पुरस्कार उगले यांना प्रदान करण्यात आला. राज्याचे ग्रंथालय संचालक किरण धांडोरे, नाशिक विभागाचे सहाय्यक ग्रंथालय संचालक आशिष ढोक, ज्ञानेश्वर कारखान्याचे कामगार अधिकारी बाळासाहेब डोहाळे, अनिल देशमुख, अण्णासाहेब खाटीक, भागवत महाराज उगले, लक्ष्मी पोपट उगले यादी यावेळी उपस्थित होते.

ज्ञानेश्वर उद्योग समुहाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ.नरेंद्र घुले पाटील, अध्यक्ष माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील, उपाध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग,जेष्ठ संचालक अड.देसाई देशमुख, कार्यकारी संचालक अनिल शेवाळे, सर व्यवस्थापक काकासाहेब शिंदे,कामगार संचालक सुखदेव फुलारी, बापूसाहेब सुपारे, कामगार संघटनेचे सेक्रेटरी जनार्दन कदम, उपाध्यक्ष भाऊसाहेब चौधरी यांनी उगले यांचे अभिनंदन केले.

# दुधाला किमान आधारभूत दर देण्यासाठी १५ दिवसांची मुदत : बच्चू कडू

**मुंबई (प्रतिनिधी)** : येत्या पंधरा दिवसात सरकारने दूध उत्पादकांना आधारभूत किंमत मिळवून देण्याचा प्रयत्न करावा, अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा आमदार बच्चू कडू यांनी दिला आहे. दुध प्रश्नावर आज दुग्धविकास मंत्री महादेव जानकर आणि प्रहार संघटनेच्या कार्यकर्त्यांची बैठक झाली. यानंतर लगेचच बच्चू कडू यांनी माध्यमांशी बोलताना दुध दरवाढीबाबत आक्रमक भूमिका मांडली आहे.

आमदार बच्चू कडू यांनी महादेव जानकर यांच्यासोबत झालेल्या बैठकीची माहिती दिली. दूधाची भुकटी करणाऱ्या संस्थांना सरकार प्रति लिटर ३ रुपये अनुदान देणार आहे. तसेच ऊस उत्पादकांप्रमाणे ७०/३० च्या कायद्याची अंमलबजवणी दूध उत्पादकांनाही लागू करण्याचा सरकारचा विचार असल्याचे आश्वासन जानकर यांनी दिल्याचे आमदार कडू यांनी सांगितले.

दूध उत्पादकांना प्रति लिटर किमान २६ रुपये दर मिळेल. जे सहकारी दूध संघ शेतकऱ्यांना दर देणार नाहीत, त्यांच्यावर फौजदारी गुन्हा दाखल करावे, यासाठी जानकर यांनी



सकारात्मक भूमिका घेतली आहे. पुढील कॅबिनेट बैठकीत सरकार काही महत्त्वाचे निर्णय घेणार असल्याचे त्यांनी सांगितले. फॅट चोरी आणि भेसळ यावर नियंत्रण ठेवण्यासाठी भरारी पथक तैनात करण्याची घोषणा जानकर यांनी केली आहे.

आमदार बच्चू कडू यांनी सरकारच्या भूमिकेबाबत समाधान व्यक्त केल्याने उपस्थित कार्यकर्ते हे घोषणाबाजी करतच मंत्रालयातून बाहेर पडले. त्यामुळे मंत्रालय परिसरात काहीकाळ गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते.